



दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : ३३३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, सोमवार, दि.१४ जुलै २०२५


## मनसे-शिवसेना ठाकरे गटाची युती होणार? आदित्य ठाकरे म्हणाले...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१३, मुंबई :** मुंबईमध्ये पाच जुलैला ठाकरे बंधुंचा एकत्रित मराठी भाषा विजयी मेळावा पार पडला. या मेळाव्याला ठाकरे गट आणि मनसे दोन्ही पक्षाच्या प्रमुखांसह सर्व नेते एकत्रित आल्याचे पाहायला मिळत आहे. या मेळाव्याच्या निमित्ताने तब्बल वीस वर्षांनंतर महाराष्ट्रात ऐतिहासिक चित्र पाहायला मिळालं.

ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्यानं अवघा महाराष्ट्र सुखावला. पुन्हा एकदा मनसे आणि शिवसेना ठाकरे गट युतीच्या चर्चांना बळ मिळाले. पण राज ठाकरेंनी नेत्यांना युतीविषयी भूमिका न मांडण्याच्या सूचना दिल्याने संभ्रम निर्माण होत आहे. आता युतीबाबत शिवसेना ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे.



माध्यमांशी संवाद साधताना आदित्य ठाकरे म्हणाले, सध्या महाराष्ट्रात वातावरण आहे, दोन्ही भावांनी एकत्र यावे यासाठी वातावरण आहे. यावर सविस्तर चर्चा होईल, पण हे सेंटिमेंट महाराष्ट्र हिताचं आहे. महाराष्ट्राच्या मनात आहे ते होईल.

आदित्य ठाकरेंनी जनसुरक्षा विधेयकावरून सरकारवर टीकाही केली आहे. फडणवीसांच्या विधानावर प्रत्युत्तर देताना आदित्य ठाकरेंनी 'ते म्हणतात की डावी विचारसरणी? पण ज्या देशात ८० टक्के लोक रेशन वर राहतात, ते सरकार कोणत्या विचारसरणीचं आहे डावं की उजवं?' असा खडा सवाल उपस्थित केला आहे.

आदित्य ठाकरेंनी जनसुरक्षा विधेयकाबाबत प्रश्न उपस्थित केले. 'ज्या योजना आपण काढतो त्या लेफ्टिंग आहेत, सध्या संविधानाला धोका निर्माण झाला आहे. भाजपचेच खासदार आहेत ते संविधान विरोधी आहेत. त्यांच्यावरही कारवाई करणार आहात का? आतापर्यंत ज्या कारवाया झाल्या त्या कोणत्या कायद्यांतर्गत केल्या? जे अतिरेकी, नक्षलवादी असतील त्यांना सोडायचं नाही, पण या कायद्यात जनसुरक्षा हित नाही, ते जे आणण्याचा प्रयत्न करत आहेत, त्याला आम्ही विरोध करत आहोत. यामुळे मीडियाचे सुद्धा स्वातंत्र्य निघून गेले आहे,' असे आदित्य म्हणाले.

## नवी मुंबई एअरपोर्ट वरुन पहिले विमान उडणार सप्टेंबर महिन्यात

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.१३, ठाणे :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर जगातील सर्वात जलद बॅग क्लेम सिस्टीम विकसित करण्यात यावी, हे या विमानतळावरील प्रमुख वैशिष्ट्य असावे, अशी सूचना आज मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना येथे दिली. सद्य:स्थितीत या विमानतळाचे ९४ टक्के काम पूर्ण झाले असून उर्वरित सहा टक्के काम सप्टेंबर २०२५ पर्यंत पूर्ण करून पहिले प्रवासी विमान उडणार, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगती पथावरील कामाची पाहणी करण्यासाठी आज या ठिकाणी आले असता ते बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, वनमंत्री गणेश नाईक, माजी खासदार रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महेश बालदी, मंदा म्हात्रे, सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी, जिल्हाधिकारी किसन जावळे, सिडकोचे सह व्यवस्थापकीय संचालक शंतनु गोयल, राजा दयानिधी, गणेश देशमुख, मुख्य दक्षता अधिकारी सुरेश मेंगडे, गीता पिलाई , नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त संजय सिंह येनपुरे, उपायुक्त रश्मी नांदेडकर यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह इतर सर्व मान्यवरांनी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रगती पथावर असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी



केली. ही पाहणी करताना त्यांनी विशेषतः विमान प्रवाशांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधांचा आढावा घेतला.

येथील कामांची पाहणी झाल्यानंतर मुख्यमंत्री फडणवीस यांनी प्रसारमाध्यम प्रतिनिधींना प्रकल्पाच्या सद्य:स्थितीविषयी माहिती दिली की, दि.१० जून २०२२ रोजी सिडकोतर्फे १ हजार १६० हेक्टरच्या संपूर्ण जागेवर १००% प्रवेश आणि मार्गाधिकारासाठी अनुज्ञप्ती एन.एम.आय.ए.एल. ला प्रदान करण्यात आली आहे. सर्व पुनर्वसन पूर्ण झाले आहेत आणि सिडकोने भूसंपादन आणि पुनर्वसन यासाठी अंदाजे २००० कोटी खर्च केले आहेत.

नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (एनएमआयएएल) या कंपनीने दि.२९ मार्च २०२२ रोजी प्रकल्पासाठी वित्तीय ताळेबंदी (फायनान्शिअल क्लोजर) साध्य केली, ज्यामध्ये एसबीआय ने नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टप्पा-१ आणि टप्पा २ साठी १९ हजार ६४७ कोटी रु. एकूण प्रकल्प खर्चापैकी १२ हजार ७७० कोटी रु. मंजूर केले आहेत (एनएमआयएएल द्वारे रु.१५ हजार ९८१ कोटी आणि सिडकोद्वारे रु.३ हजार ६६५ कोटी)

सिडकोतर्फे १ हजार १६० हेक्टर क्षेत्रामध्ये ५.५ मीटरपर्यंत भूविकास, उलवे नदीचा प्रवाह वळविणे आणि उच्च दाबाच्या विद्युत वाहिन्यांचे स्थानांतरण, ही विकासपूर्व कामे पूर्ण करण्यात आली आहेत.

दि.११ ऑक्टोबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर भारतीय हवाई दलाच्या वाहतूक विमान सी-२९५ द्वारे उद्घाटन लँडिंग करण्यात आले आणि त्यानंतर एसयु ३० ने दोन लो पास केलेत. तसेच इंडिगो एअरलाइन्सच्या एअरबस ए ३२० ने २९ डिसेंबर २०२४ रोजी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर पहिले व्यावसायिक लँडिंग यशस्वीरित्या पूर्ण केले.

दि.३० जून २०२५ पर्यंत या प्रकल्पाने एकूण ९६.५% भौतिक प्रगती साधलेली आहे. सध्या जवळपास १३ हजार कर्मचारी या ठिकाणी कार्यरत आहेत तर उर्वरित काम पूर्ण होण्यासाठी अधिक कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात यावी. आणि कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर पूर्वी हे काम पूर्ण करावे, अशा सूचना सर्व यंत्रणांना देण्यात आल्या आहेत.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या १ आणि २ टप्प्यामध्ये २० दशलक्ष प्रवासी आणि ०.८ दशलक्ष मेट्रिक टन मालवाहतूक करण्याची क्षमता आहे, हे विमानतळ सप्टेंबर २०२५ मध्ये कार्यान्वित होण्यासाठी सज्ज होत आहे.

या विमानतळाचे भूमीपूजन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले होते आणि त्याचे उद्घाटनही आता त्यांच्याच हस्ते होणार आहे, याचा विशेष आनंद असल्याचेही ते शेवटी म्हणाले.

## जमीन अधिग्रहणासाठी कोल इंडिया देणार प्रति एकर ३० लाख

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** देशातील सर्व कोळसा खाणींसाठी अधिग्रहित केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात शेतकऱ्यांना प्रति एकर ३० लाख रुपये देण्यास कोल इंडियाने तत्वत: मान्यता दिली आहे. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर यांनी बोलावलेल्या महत्वाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. कोलकत्ता येथील मुख्यालयात अहिर यांच्या अध्यतेखाली १० जुलै रोजी झालेल्या बैठकीत पश्चिम बंगाल सरकारचे मुख्य सचिव, कोल इंडियाचे अध्यक्ष, कार्मिक संचालक, सीएमडी, डीपी आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पश्चिम बंगाल राज्य सरकार, कोल इंडिया, डब्ल्यूसीएल, ईसीएल, सीएमपीडी आयएल, एम्स, कल्याणी ब्रेथवेट आदी कंपन्यांशी संबंधित विविध मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. याप्रसंगी कोल इंडिया समवेत झालेल्या बैठकीदरम्यान वेकोलि




व अन्य आस्थापनाद्वारे शेतकऱ्यांच्या अधिग्रहित होणाऱ्या जमिनीला सद्यस्थितीत मिळणारा प्रति एकर आर्थिक मोबदला मागील वर्ष २०१२ मध्ये निश्चित झाल्यानंतर त्यामध्ये वृध्दी करण्यात आलेली नाही. या विषयावर चर्चा झाली. हा मोबदला वाढवून तो ३० लाख रुपये प्रति एकर करण्याविषयी सूचना अहिर यांनी केली. त्यावर कोल इंडियाने प्रति एकर मोबदल्यात वृध्दी करण्याबाबत तत्वत: मान्यता देत यासंदर्भात ठोस धोरणात्मक प्रस्ताव लवकरच तयार करण्यात येईल, असे सांगितले. बैठकीत अहिर यांनी, प्रकल्पग्रस्तांच्या पदस्थापनेच्या मानक कार्यप्रणाली (एसओपी) मध्ये बदल करुन शैक्षणिक पात्रता धारकांना भूमिगत खाणीत पदस्थापना देण्याविषयी अनिवार्य करु नये. सुरक्षाकर्मींच्या पदस्थापनेची आर्युमर्यादा ३५ हून ४० वर्ष करावी, तांत्रिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या प्रकल्पग्रस्तांना सुरक्षाकर्मी पदस्थापना अनिवार्य करु नये यासह अनेक विधायक सूचना कोल इंडिया प्रबंधनास केल्या.

चंद्रपूर जिल्ह्यातील वेकोलि बल्लारपूर क्षेत्रामधील शिवणी, चिंचोली रिकॅास्ट या प्रकल्पासाठी भरीव आर्थिक पॅकेज देण्याचे तसेच वाढते प्रदूषण व कोळसा वाहतूकीमुळे उद्भवणारे शेती व अन्य नागरी नुकसान टाळण्यासाठी प्रभावी उपाययोजना आणि आर्थिक नुकसान भरपाईकरीता धोरण निश्चित करण्याचे आश्वासन बैठकीत देण्यात आले.

## श्रीराम सातपुते यांना विदर्भातून उत्कृष्ट ग्राहक कार्यकर्ता पुरस्कार

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१३, नागपूर :** ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा स्वर्गीय अरुण भार्गवे स्मृतीप्रित्यर्थ ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी उत्कृष्ट ग्राहक कार्यकर्ता पुरस्कार २०२४ चा विदर्भ विभागातून खापरखेडा येथील सामाजिक कार्यकर्ते व ग्राहक पंचायत नागपूर जिल्हा ग्रामीणचे संघटक श्रीराम सातपुते यांना नुकताच देण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्यातील प्रत्येक विभागातून ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या उत्कृष्ट काम करणाऱ्या कार्यकर्त्याला हा पुरस्कार दरवर्षी देण्यात येतो. श्रीराम सातपुते हे गेल्या २८ वर्षापासून ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या माध्यमातून सक्रीय कार्यकर्ता म्हणून कार्य करत आहे. त्यांनी अनेक ग्राहकाच्या समस्या सोडविण्यास मदत केली आहे. एवढेच नाही तर वेळप्रसंगी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगात तक्रारकर्त्याची बाजू स्वतः मांडून ग्राहकाला न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या कार्याची दखल घेऊन ग्राहक पंचायत महाराष्ट्राच्या वतीने ग्राहकतीर्थ बिंदूमाधव जोशी उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार देण्यात आला आहे. श्रीराम सातपुते यांनी राज्य अध्यक्ष डॉ. विजय लाड, सचिव अरुण वाघमारे, सहसचिव प्राध्यापक एस. एन. पाटील, संघटक सर्जेराव जाधव, सहसंघटक मेधा कुलकर्णी, कोषाध्यक्ष सुनिता राजे घाडगे, सदस्य प्रमोद कुलकर्णी, विदर्भ प्रांत अध्यक्ष शामकांत पात्रीकर, सचिव लीलाधर लोहरे, संघटिका कल्पना उपाध्याय व जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले आहे.

## थोडक्यात

### आदिवासी आश्रमशाळेतील १३ मुलींना कढी-भात खाल्लयानंतर विषबाधा !

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१२, बुलडाणा :** येळगाव येथील पैनगंगा आदिवासी आश्रमशाळेतील १३ विद्यार्थिनींना गुरुवारी रात्री विषबाधा झाल्याचे प्रकरण समोर आले. बाधित मुलींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले. यातील आठ विद्यार्थिनींना सुटी देण्यात आली असून, पाच जणींवर उपचार सुरू आहेत. या मुलींची प्रकृती स्थिर असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दत्तात्रय बिराजदार यांनी सांगितले.

पैनगंगा आदिवासी आश्रमशाळेत निवासी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनी आहेत. रात्री कढी-भात खाल्लयानंतर १३ विद्यार्थिनींना मळमळ, उलट्या, पोटदुखी आणि डोकेदुखीचा त्रास वाढला. हा प्रकार लक्षात येताच सर्व मुलींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारार्थ भरती करण्यात आले. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी मुलींवर उपचार केले. यातील आठ मुलींची प्रकृती सुधारल्याने त्यांना सुटी देण्यात आली. भाजपचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार विजयराज शिंदे यांच्या मालकीची ही आश्रमशाळा आहे.

### अंगणवाडी इमारतीच्या देखभाल दुरुस्ती कामात भ्रष्टाचार चौकशीची मागणी : कष्टकरी संघाचा आंदोलनाचा इशारा

**अक्षराज : उध्दव आटोळे**

**दि.१३, लोणार (बुलडाणा) :** लोणार तालुक्यातील विविध अंगणवाडी केंद्रांच्या इमारतींच्या मागील ३ वर्षापासून जून २०२५ पर्यंत झालेल्या बोगस देखभाल दुरस्तीच्या कामांची सखोल चौकशी करुण दोषी ठेकदार व अधिकाऱ्यावर कारवाई व्हावी, अन्यथा ९ ऑगष्ट २०२५ क्रांतीदिनी तालुक्यातील बोगस काम झालेल्या कोणत्याही अंगणवाडी वर चढुन बोगस कामाकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी अनोखे आंदोलन करण्याचा इशारा कष्टकरी संघाचे संघटन सचिव भाऊराव भालेराव,यांनी दिला आहे.

लोणार पंचायत समिती अंतर्गत विविध ग्रामपंचायत हद्दीतील अनेक अंगणवाडी केद्रांच्या देखभाल दुरुस्तीसाठी शासन दरवर्षी कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करते. मात्र, अनेक ठिकाणी हे काम करणारे ठेकेदार निव्वळ बिल वसुली पुरतीच कामे करत असल्याचे आढळून येत असल्याने अनेक केंद्रात पावसाळ्यात पाणी साचत आहे.

शासनाने किंवा संबंधीत विभागाने निर्देशीत केलेल्या अंदाज पत्रकानुसार काम न करता मोठ्या प्रमाणत शासनाच्या रक्कमेचा अपहरण केल्या गेला आहे. तरी सन २०२२ ते आजतायागत लोणार पंचायत समीतीच्या अखत्यारीतील ज्या ज्या अंगनवाड्यांची देखभाल दुरुस्तीच्या नावाखाली कामे केल्या गेली, त्या सर्व कामांची व ती कामे करणाऱ्या ठेकेदाराची संपूर्ण चौकशी करण्या यावी व दोषी आढळलेल्या शासकीय रक्कमेचा अपहार करणाऱ्या संबंधीतांवर फौजदारी गुन्हे दाखल करावी अन्यथा कष्टकरी संघाच्य वतीने शेकडो कष्टकऱ्यांना सोबत घेऊन ९ ऑगष्ट २०२५ क्रांती दिन तालुक्यातील बोगस काम झालेल्या कोणत्याही अंगणवाडी केंद्रावर चढु बेमुद्दत तिव्र अंदोलन करण्यात येईल असा इशारा निवेदनाअंती देण्यात आला आहे.

### अंमली पदार्थ विक्रेत्यांविरोधात कडक कारवाई करणाऱ्या उपायुक्त अतुल झेंडे यांचा युवासेनेकडून सत्कार

**अक्षराज : भानुदास गायकवाड**



**दि.१२, डोंबिवली :** देशाच्या तरुण पिढीला अंमली पदार्थांच्या विळख्यातून वाचवण्यासाठी ठोस पावले उचलणाऱ्या पोलिस विभागाच्या धाडसी कारवाईचे सर्वत्र कौतुक होत आहे. अलीकडेच कल्याणमधील वर्टेक्स विला सोसायटीत करण्यात आलेल्या मोठ्या कारवाईत तब्बल २ कोटी १२ लाखांचे एमडी ड्रग्स जप्त करण्यात आले. या कारवाईत आफ्रिकन ड्रग माफियांना अटक करून आंतरराष्ट्रीय ड्रग्स रॅकेटचा पर्दाफाश करण्यात मानपाडा पोलिसांना यश आले.

या धाडसी मोहिमेचे नेतृत्व करणाऱ्या कल्याण परिमंडळ ३ चे पोलिस उपायुक्त अतुल झेंडे आणि मानपाडा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीपान शिंदे यांचा युवासेनेच्या कल्याण जिल्हाध्यक्ष जितेन पाटील यांच्या नेतृत्वाखाली शाल, पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

या सत्कार समारंभात युवासेनेचे जिल्हा सचिव राहुल म्हात्रे, उपजिल्हाध्यक्ष प्रथमेश पाटील, भूषण यशवंतराव, डोंबिवलीचे शहराध्यक्ष सागर जेधे, कल्याण पश्चिमचे शहराध्यक्ष सुजित रोकडे, विधानसभा क्षेत्राध्यक्ष सागर दुबे, जय देसले, विक्की जोशी, चिन्मय पाटील, सुचेत डामरे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष जितेन पाटील म्हणाले की, पोलिस दलाने सातत्याने केलेल्या कारवायांमुळे मागील आठवड्यातच ४ कोटीहून अधिक किंमतीचे ड्रग्ज जप्त करून ५ आरोपींना अटक करण्यात आली. ही अतुलनीय आणि प्रशंसनीय मोहीम असून, अशा पोलिस अधिकाऱ्यांचा गौरव करणे हे आमचे कर्तव्य आहे. युवा पिढीला नशेपासून दूर ठेवण्यासाठी युवासेना कायम पुढाकार घेणार असून, 'ड्रग्जमुक्त समाज आणि सशक्त युवा' हेच आमचे ध्येय आहे.

युवासेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस अधिकाऱ्यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आणि पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. पोलिस दलाची तत्परता, सजगता आणि धाडस हे समाजासाठी प्रेरणादायी असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

# संपादकीय



## कल्पना आधारित शिकणं

दहा कोटी वर्षांपूर्वी प्राण्यांच्या मेंदूच्या उत्क्रांतीच्या पुढील टप्प्यात 'निओकॉर्टेक्स' हा भाग तयार झाला.'निओकॉर्टेक्स ' हे मेंदूचे अग्रभागी असलेले क्षेत्र विचारशक्ती, तर्क, आणि कल्पनाशक्ती या क्षमतांशी संबंधित आहे. त्यामुळे एखादी गोष्ट प्रत्यक्ष न करता, ती केवळ मनातल्या मनात करून पाहिल्यास तिचे काय परिणाम होतील, याचा अंदाज घेता येऊ लागला. त्याच्या आधाराने भविष्याचे नियोजन करण्याची क्षमता प्राण्यांमध्ये विकसित झाली. यालाच 'कल्पना आधारित शिकणे' किंवा 'करण्याआधी शिकणे' असे म्हटले जाते.

आज इतर प्राण्यांपेक्षा मानव प्राणी या क्षमतेमध्ये खूप पुढे गेला आहे. ज्याला भविष्याचा वेध घेता येतो, तो इतरांपेक्षा यशस्वी ठरतो. आपणही आज अनेक गोष्टी कल्पनेच्या आधारे शिकतो. रिकाम्या जागेवर आपल्या स्वप्नातील घराची कल्पना आपण करतो. त्यानुसार पुढील पावले उचलतोकोठे स्नानगृह, स्वयंपाकगृह, शयनकक्ष असावा, सूर्यप्रकाश कोणत्या दिशेने यावा, याचा विचार करतो. आता आर्किटेक्ट लोक त्या जागेवर घर कसे दिसेल, याची प्रतिकृती लहान स्वरूपात तयार करून देतात.

अशा कल्पनाशक्तीबद्दल कविवर्य बा. सी. मर्ढेकर आपल्या कवितेत उपहासात्मक भाषेत लिहितात गणपत वाणी बीडी पिताना

चावायचा नुसतीच काडी;
म्हणायचा अन् मनाशीच की
या जागेवर बांधीन माडी...

या कवितेतून स्वप्नरंजनात हरवणाऱ्यांना आणि कृतीशून्य राहणाऱ्यांना चपराक दिली आहे. म्हणूनच, मनातल्या मनात इमले बांधण्यात समाधान मानणं आणि कृतीकडे दुर्लक्ष करणं याला व्यवहारात किंमत नसते.

पर्यटनासाठी बाहेर पडताना आपण हवामान, भौगोलिक परिस्थिती आणि अचानक येणाऱ्या संकटांचा विचार करून तयारी करतो. उदाहरणार्थ, सह्याद्री पर्वतात जंगलात भटकंतीसाठी निघताना मजबूत बूट घालतो. कारण, जर पाय सर्पावर पडला, तर तो डंख करू शकतो. हे आधी कधीच घडलं नसलं तरी मनात हे चित्र उभं राहतं आणि आपण शहाणपणाने निर्णय घेतो.

लाखो वर्षांपूर्वी आदिमानवाला सुळ्यांसारखी दगडी हत्यारे बनवण्याची कल्पना मांसभक्षक प्राण्यांकडे पाहून सुचली असेल. त्याने कल्पना केली की हे सुळे आपल्याकडे नसले तरी दगडांमध्ये अशीच धार असलेली साधने आहेत. ही दगडी हत्यारे फेकून प्राणी मारता येतील आणि शिकार सहज मिळेल. अशा प्रकारे 'कल्पना आधारित शिकणे' त्याला शिकारीत यशस्वी ठरवू लागले. आजही दगडी हत्यारांपासून ते अण्वस्त्रांपर्यंत माणसाची वाटचाल ही कल्पनाशक्तीच्या बळावरच घडली आहे.

आज मानव नद्यांवर मोठमोठी धरणं बांधतो, गगनचुंबी इमारती उभारतो, कृत्रिम उपग्रह अंतराळात पाठवतोया सर्व कल्पनाशक्तीचाच परिपाक आहेत. इंटरनेट, एआय (अख), रोबोटिक्स, बायोटेक्नॉलॉजी यांमध्ये जी प्रगती पाहतो, ती सर्व माणसाच्या करण्याआधी शिकण्याच्या वृत्तीची फळं आहेत. अगदी अंतराळात जाण्यापूर्वी अनेक सिम्युलेशन्स, परीक्षणं, कल्पित प्रतिकृती वापरून तयारी केली जाते.

करण्याआधी शिकणे म्हणजेच खरा शहाणपणा. पुढच्याला ठेच, मागचा शहाणा ही म्हण यालाच पुष्टी देते. जो दुसऱ्याच्या अनुभवातून शिकतो, तो शहाणा समजला जातो. याउलट जो शिकत नाही, तो मूर्ख किंवा सामान्य बुद्धीचा मानला जातो.

करण्याआधी शिकणे ही बुद्धिमत्तेची कसोटी असते. ज्याची तार्किक बुद्धी तीव्र असते, तो कल्पनाशक्तीच्या बळावर अनेक गोष्टींची पूर्वकल्पना करतो. तर्क लावणे म्हणजे बुद्धीला ताण देणे. परंतु बरेच लोक या बौद्धिक कष्टांना टाळतात. त्यांना झटपट आणि सोप्या मार्गाने यश हवे असते.जेवढे आपण बौद्धिक मेहनत करतो, तेवढा आपल्याला मिळणारा लाभ टिकाऊ, फायदेशीर आणि सर्वांसाठी उपयुक्त असतो. म्हणूनच, मनाची एकाग्रता साधून तर्क आणि कल्पनेच्या आधारे शिकणे, हे जीवनात सर्वोच्च मानले पाहिजे.

# गावाकडील जुगाडी रेनकोट..!



**श्री.विनोद शेनफड जाधव**
**मासरूळ जि.बुलडाणा**


गावाकडच्या गोष्टीच निराळ्या...! साधेपणात खरं सौंदर्य असतं याचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे गावात कडील जीवन...! ना एखाद्या गोष्टीचा फाफटपसारा ना भपकेबाजी. अगदी साधं जीवनमान..! खरचं किती आनंद निर्माण करणार असतं ना...!कोणाबद्दल ईर्षा नाही.जलन नाही. आहे त्या परिस्थितीत जगणं व त्यातच समाधान मानणं. असं साधंसूद जीवन जगण्याची कला खेड्यातंच बघायला भेटेल. गावातील लोकं शेतकरी तथा मजूर वर्गांचे,आर्थिक परिस्थिती जवळपास सगळ्यांची जेमतेमच. असतीलही बडे जमीनदार.भरपूर प्रमाणात शेतीतून उत्पन्न घेणारे मात्र,त्याचंही जीवन जगणं अगदी साधच.ज्यांच्याकडे भरपूर प्रमाणात संपत्ती असूनही,दाखवण्याचा खटाटोप कधी करत नाही.खेड्यातील सर्व समान सर्व राहणीमान मग ते शाळेतील मुलांपासून ते ग्रामपंचायतीच्या ओट्यावर बसणारे वृद्ध ही सारखेच साधेच ना जातीची दूरी ना,आर्थिक विषमता...!

शाळेत शिकायला जाणारी पोरं पावसाळ्यात शाळेत यायचं म्हटलं की, अंग ओला होऊ नये म्हणून छत्र्या रेनकोट आमच्याकडे नव्हत्या. माय आमच्यासाठी छान गावठी बिनखर्ची पोतड्यांचा रेनकोट बनवून द्यायची.शेतात पिकांच्या वाढीसाठी खत टाकतात.साधारण या खतांसाठी पॉलिथिनच्या पिशव्या वापरतात.त्याला गावाकडे पोतडी म्हणतात. हीखताची पोतडी साधारण पन्नास किलोची असते. त्या पोतडीची साईज साधारण दोन ते तीन-साडेतीन फुटाचे असते.शेतात खत टाकल्यानंतर,ती पोतडी रिकामी झाली असता. शेतकरी त्या एकत्र गोळा करून ठेवतो.त्या पोतडयांना चारी बाजूंनी उसवून,कापून व्यवस्थित चौरसाकृती करतात. त्याच चार ते सहा पोतडयांपासून पट्टी बनवतात. तीच पट्टी शेतातील धान्य ओलं होऊ नये म्हणून वापरतात किंवा धान्य वाळत घालण्यासाठी वापरतात. त्यालाच शहरी भागात मेन कापडाची फट किंवा ताडपत्री म्हणतात.

या खतांच्या पोतड्यांचा वापर आमची माय छान घोंगटा करून द्यायची.त्याला काही ठिकाणी घोंगटा असेही म्हणतात. आमच्यासाठी माय-बाबा हाच घोंगटा म्हणहेच इंग्रजीतरेनकोट बनवण्यासाठी रिकाम्या झालेली खताची पोतडी स्वच्छ धुऊन काढायची.कारण त्यामध्ये आतील भागात खताचा काही अंश शिल्लक राहायचा.ते दाणेदार खत पोतडीच्या कोपऱ्यात चिटकून राहायचे म्हणून,आतमध्ये पाणी स्वच्छ टाकून धुयायचे.तीच आयताकृती पोतडी त्यातील बंद भागाकडील बाजूचा एक कोपरा त्या पोतडीच्या आत कोंबायचा.तोच बंद भागातील दुसऱ्या भागापर्यंत...! त्यामुळे डाव्या हातात धरून उजव्या हाताने कोंबलेल्या भागामुळे एक त्रिकोणी झोपडी सारखा भाग तयार व्हायचा. पोतडीचा एक भाग आत कोंबल्यामुळे पोतडी अजून थोडीशी लहान व्हायची.जो त्रिकोणी झोपडी सारखा बनलेला भाग तो डोक्यावरील भाग राहायचा. तो त्रिकोणी भाग डोक्यावर ठेवून पाठीमागून टाकला तर, डोक्यापासून मान,खांदा पाठीकडील भाग ते कमरे पासून गुडघ्यापर्यंत ती पोतडी पोहोचायची. साधारण पहिली ते चौथीपर्यंत ती साईज बरोबर परफेक्ट बसायची.त्या पॉलिथिन पोतडीमुळे डोक्यावर पडलेलं पावसाचं पाणी ओघळून जायचं. म्हणजेच डोक्यापासून गुडघ्यापर्यंत हा घोंगटा खालपर्यंत पोहोचल्यामुळे पावसाच्या पाण्यात अंग ओलं होत नव्हतं. पाठीवर घेतलेलं दफ्तर ते पण ओलं होत नव्हतं. हाच आमच्या घोंगडा म्हणजेच गावाकडील जुगाडी रेनकोट..! माय पुढे तिच्या कलेने अजून छान शक्कल लढवायची ती अशी की,पोटाजवळील भाग हा स्थिर राहावा. तो हवेने उडून नये, म्हणून माय कपड्याचा लेस म्हणजेच नाडी तयार करायाची. दोन्ही बाजूने गोधडी शिवायच्या दोऱ्याने त्याला शिवून द्यायची. त्या दोन्ही बंध जवळपास पोटाच्या समोरील भागावर बुटाचे बंध बांधून दिल्यासारखी बांधून द्यायची त्यामुळे घोंगट्याला छान पकड यायची त्यामुळे अंग झाकून जायच. त्याचबरोबर पाण्याच्या थंड गारव्यामुळे अंगाला हूड-हुडी भरून यायची ती कमी व्हायची.थोडासं उबदार वाटायचं.पावसाळ्यात पाऊस चालू असला की, हा घोंगटा घालून शाळेत पोहोचलो की, शाळेच्या व्हरंड्यात काढून ठेवायचो.त्यावरील पाणी झटकून छान घडी घालून ठेवायचो.अश्या या आमच्या लहानग्यांसाठीचा पावसाळ्यातील पाण्यापासून संरक्षण व्हावं अंग ओलं होऊ नये म्हणून बनवलेलाजुगाडी रेनकोट खरंच अप्रतिम असायचा. असच जुगाडी बिनखर्चिक जुगाडी रेनकोट मोठ्या महिलांसाठी व पुरुषांसाठीही त्यांच्या उंचीनुसार मोठ्या गोणपाटाच्या पोत्याचा बनवल्या जायचा.शेतातील कामे व इतर कामासाठी मोठी बाया-माणसं वावरात घालून जायचे.शेतात गुरांचा गुरांसाठी चारापाणी करण्यासाठी, गाई-म्हंशीचे दूध काढून आणण्यासाठी ही मोठी मंडळी हा घोंगटा अर्थात,हाच जुगाडी रेनकोट वापरायचे.आम्ही पोरं शाळेत घेऊन जायचो.माय-बांनी दुकानातून काही वस्तू आणण्यासाठी पाठवले तर, छान भटकत-मटकत जायचो.बागडायचो.रस्त्यावरील पडलेलं पाणी पायाने उडवत-उडवत छान मजा करायचो.

असा हा खतांच्या रिकाम्या झालेल्या पोतड्यांपासून बनवलेला गावाकडील रेनकोट हा अगदी एक रुपया खर्च न लावता माय बनवून द्यायची.विषय हा नाही की,तो बनवण्यासाठी किती खर्च लागला.तसं बघितलं तर शून्य रुपये खर्च न लागता हा गावाकडील रेनकोट बनवल्या जायचा. मात्र त्याची किंमत आमच्यासाठी हजारो रुपयांपेक्षा जास्त होती कारण,गावाकडची आमची माय तिची माया,प्रेम ओतून ती बनवायची.तिचं श्रम, माया त्यामध्ये उतरलेलं असायचं.अन हो अहो! बाजारातून रेडिमेड आणलेल्या किमती रेनकोट पेक्षा आमच्यासाठी हा शेकडोपटीने किमती होता. तो अजूनही कायम स्मरणात राहील.

# त्रिसूत्री भाषेसाठी अभ्यासपूर्ण चळवळ उभारावी




बिहार, उत्तर प्रदेश, राजस्थान आणि हिमाचल प्रदेश यासारख्या राज्यांमधील ९०% पेक्षा जास्त लोक फक्त हिंदी भाषा बोलतात. तर फारच कमी लोक दुसऱ्या भाषेत संवाद साधत असल्याचे दिसून येते. यामूळे ह्या प्रदेशांमध्ये भाषिक असमानता वाढत आहे, इंग्रजी वा दुसऱ्या भारतीय भाषेत कमी लोक बोलताना दिसतात. याउलट, तामिळनाडू, केरळ आणि ओडिशासारख्या राज्यांमध्ये द्विभाषिक भाषिकांचे प्रमाण लक्षणीय आहे. तामिळनाडूमध्ये, फक्त तमिळ बोलणाऱ्या लोकांची टक्केवारी घसरली असली तरी इंग्रजी ही दुसरी भाषा म्हणून त्यांनी स्वीकारली आहे. ओडिशामध्येही हीच परिस्थिती आहे. यातून या राज्यांमधील लोक रोजगाराच्या संधी, शिक्षण किंवा स्थलांतरासाठी दुसरी भाषा शिकत असल्याचे दिसत असले तरी हिंदी भाषा स्वीकारण्यात त्यांना फारसे स्वारस्य दिसून येत नाही. तामिळनाडू आणि केरळ, जिथे जास्त लोक दुसरी भाषा म्हणून इंग्रजी बोलतात तेथे बहुतेक हिंदी भाषिक राज्यांच्या तुलनेत सामाजिक-आर्थिक निर्देशकांमध्ये ते वरचे स्थान मिळवतात. हिंदी पट्ट्यातील बरेच लोक चांगल्या आर्थिक संधींच्या शोधात दक्षिणेकडील आणि पश्चिमेकडील राज्यांमध्ये स्थलांतर करत आहेत, परंतु इंग्रजी किंवा प्रादेशिक भाषांमध्ये प्रवीणता नसल्यामुळे त्यांची अनेकदा गैरसोय होते. मात्र महाराष्ट्रात हिंदी भाषेला अनावश्यक महत्व देण्यासाठी सुरू असलेला प्रयत्न अनाकलनीय आहे. असे असले तरी राज्यात शैक्षणिक अभ्यासक्रमात हिंदी भाषेच्या समावेशावरून उठलेला राजकिय गदारोळ भाषिक अस्मितेसोबतच राजकीय अस्तित्व सिध्द करण्याचीही धडपड आहे हेही खरेच आहे. केंद्र आणि राज्य सरकारमधील समन्वयामध्ये सर्वकाही अलबेल असल्यामुळे आज ना उद्या केंद्राचे नव्या शैक्षणिक धोरणातले त्रिभाषा सूत्र स्विकारायला लागेल हे उघड वास्तव आहे. त्यामुळे हिंदीचे उदात्तीकरण तांत्रिकदृष्ट्या मोडीत काढण्याचे सोडून केवळ पुरेशा अभ्यासाअभावी हिंदीसक्ती ह्या एकाच शब्दाभोवती फिरवण्यात येत असल्याचे दिसून येते. तिसऱ्या भाषेच्या रुपात हिंदी ही पर्यायी भाषा दिलेली असली तरी राज्यातील हिंदी भाषिकांची संख्या पाहता तिची अनिवार्यता अधोरेखित होते. त्यामुळे उद्या बहुबोली समजली जाणारी हिंदी ही राज्यात तिसरी भाषा म्हणून जन्म घेणार हेही तितकेच खरे. उद्या शाळांमध्ये पालकांकडून भाषेला पर्याय मागितले तर बहुबोली आणि परप्रांतीय भाषिकांमुळे अधिकाधिक प्रमाणात हिंदीचा पर्याय समोर येईल हे उघड सत्य आहे. असे झाले तर राज्यात मराठीचे अस्तित्व धोक्यात येणार आहे. आता त्याला झालेला प्रखर विरोध व राजकीय जमवाजमव पाहून हा अध्यादेश रद्द किंवा स्थगित होणार हे अपेक्षितच होते. त्यात आता ह्या भाषाविवादाचा अभ्यास करण्यासाठी नव्याने समिती नेमण्याचा सरकारचा निर्णय पुन्हा ह्या विषयाला अधांतरीच ठेवणारा आहे. उद्या समितीने हिंदी ही तिसरी पर्यायी भाषा निवडण्याचे स्वातंत्र्य पालकांना दिले तर किती पालक मुलांसाठी हिंदी ही पर्यायी भाषा म्हणून स्वीकारतील याचाही अंदाज बांधायला हवा. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानंतर राज्याची अस्मिता टिकवण्यासाठी फार मोठी चळवळ निर्माण झालेली नसताना हिंदी भाषा सक्तीचे आयते कोलीत विरोधकांच्या प्रामुख्याने प्रादेशिक पक्षांच्या हाती आले आणि त्याला वाढता पाठिंबा सरकारी पक्षांना भविष्यात त्यांच्या राजकीय वाटचालीत निश्चित अडथळा निर्माण करणारा ठरेल. तूर्तास सदरच्या निर्णयास समितीच्या मार्गाने स्थिगिती देण्याचा तोडगा काढण्यात आलेला असला तरी राज्यातील भाषा वैविध्य टिकवण्यासाठी तिसऱ्या भाषेचा पर्याय द्यावाच लागणार आहे. १०७ मराठी हुतात्मे देऊन शेतकरी कामगारांनी लढा देऊन मराठी माणसांचा मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र आकाराला आला. आता देशाच्या कोणत्याही भागातून आलेला माणूस प्रथम हिंदी अथवा इंग्रजी मध्ये बोलतो. वित्तीय संस्थेकडून कर्ज घेण्यासाठी येणारे फोन हिंदीतून येतात. राष्ट्रीयकृत बँक, रेल्वे सैन्यदल केंद्रीय आस्थापना यात परप्रांतातून आलेले कर्मचारी हिंदी इंग्रजी भाषेत बोलतात. आर्थिक राजधानीतील सर्व आर्थिक नाडया परप्रांतीयांच्या ताब्यात गेल्या आहेत. रोजगारासाठी आलेल्या लोंढ्यानी झोपडपट्ट्या - फुटपाथ व्यापले, ते जास्त हिंदी बोलतात. रिक्षा टॅक्सी ड्रायव्हर मध्ये परप्रांतीय प्रमाण जास्त ते हिंदी बोलतात. आयटी क्षेत्रात आलेले लोक परप्रांतीय प्रमाण जास्त असून ते हिंदी वा इंग्रजी बोलतात. राज्यातील हॉटेल व्यवसायात मालक आणि वेटर म्हणून परप्रांतीय प्रमाण जास्त असून ते हिंदीतच बोलतात. अगोदरच वाचनाचे प्रमाण कमी झाले आहे. त्यामुळे वाढत्या हिंदीकरणाचा पुढील १० ते १५ वर्षात मराठी वृत्तपत्रे व मराठी वाहिन्या यावर परिणाम होईल. गेल्या ७ दशकात मराठी महाराष्ट्राने संयुक्त महाराष्ट्राचा लढा विसरून आपल्या मातृभाषेपेक्षा हिंदीला स्वीकारले आहे हेच यातून दिसून येत आहे. त्यामुळे नवी पिढी हिंदी इंग्रजी बोलताना मराठीला दुय्यम तिय्यम स्थान देत आहे. मराठी मुलेच मराठीपेक्षा हिंदी चित्रपट, मालिका जास्त बघतात. त्यामुळे भाषेसाठी लढा उभारताना आत्मचिंतानाची देखील आपल्याला आवश्यकता आहे हे विसरून चालणार नाही. मराठी भाषिकांनी स्वभाषेचा अभिमान सार्वजनीक ठिकाणी वावरताना दाखवला पाहीजे. हिंदीचे उदात्तीकरण थांबवताना मातृभाषेला आपल्या संवादातून ढळून न देण्याची खबरदारी आपण सर्वांनी घेतली पाहिजे. पाचवीच्या पुढे हिंदी भाषा अभ्यासक्रमात असताना पहिलीपासूनच हिंदीचा आग्रह योग्य नाहीच पण मराठी भाषेच्या संवर्धन करण्याची जबाबदारीदेखील आपल्या सर्वांची आहे. छत्रपती शिवराय, संत श्रेष्ठ ज्ञानोबा, तुकारामांच्या ह्या महाराष्ट्रावर आणि त्यावर मराठी भाषेवरचे अनावश्यक हिंदी आक्रमण हे थोपवलेच पाहिजे मात्र त्यासाठी राजकीय मार्ग न वापरता महाराष्ट्राचा इतिहास, बलिदान, कमतरता याचा विचार करून अभ्यासपूर्ण चळवळ उभाराव लागेल. मराठीसाठी सुरू झालेला हा लढा केवळ राजकीय स्वार्थ साधण्यासाठी मर्यादित राहू नये एव्हढीच अपेक्षा आहे.

**- वैभव मोहन पाटील**
**घणसोली, नवी मुंबई**

## जमिनी...



प्रकल्प येणारं गावी
चुके काळजां ठोका
रोध पाचवीला पूजा
आधी बोंबाटा ठोका

देणार नाही जमिनी
बेशक सांगूनि टाका
सर्वेक्षण अधिका-यां
दम आणायचा नाका

लगेचं चालो निदर्शने
होई पर्यावरणांधोका
नाहीनाही म्हणायचा
घालवू नकात मोका

हक्काचे असे मालक
नको आम्हांस भिका
एन केन प्रकारेण बा
प्रतिरोधकरायं शिका

साखळीउपोषण करे
गुपचुप भागवा भुका
प्राणांतिकउपोषणास
बसवावे एखाद मुका

येतीलं चर्चाकरायला
बंदिस्त कानांने ऐका
वाढवत रहा मागण्यां
का सोडू माझा हेका

मिडीयापाचारण करे
आगीमध्ये तेल टाका
आंदोलने न् निदर्शने
उडव झकास भडका

रद्द होई अंति प्रकल्प
असा आपला दणका
पुन्हा ना नवी योजना
मोडूनि टाका मणका

**- हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## खासदार निलेश लंकेच्या आंदोलनाला यश

### प्रकल्प संचालकांचे लेखी आश्वासन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१२, अहिल्यानगर :** राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंदरकर यांच्या निर्देशानंतर ठेकेदाराने नगर-मनमाड रस्त्याचे काम सुरू केल्याने तसेच हे काम कालबद्ध पूर्ण करण्याचे लेखी आश्वासन दिल्याने खासदार नीलेश लंके यांनी दिनांक ११ जुलै २०२५ रोजी सुरू केलेले उपोषण दिनांक १२ जुलै २०२५ रोजी सायंकाळी मागे घेतले. माजी आमदार दादा कळमकर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष जयंत वाघ यांच्या हस्ते त्यांनी उपोषण मागे घेतले. नगर-मनमाड रस्त्याच्या कामाचा अडीच महिन्यांपूर्वी कार्यारंभ आदेश देऊन ही हे काम सुरू करण्यात आले नाही. जीवघेणा ठरत असलेल्या या रस्त्याचे काम तातडीने सुरू करा. या मागणीसाठी खासदार लंके यांनी कालपासून जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण सुरू केले होते. खासदार लंके यांना दिलेल्या लेखी आश्वासनात नमूद केले, की निर्देशानुसार ठेकेदाराने आज राहुरी कारखाना, शनिशिंगणापूर फाटा व देहरे येथे काम सुरू केले आहे. कणगर व पिंपरी निर्मळ येथे प्लॅण्ट उभारणी, यंत्रसामग्री व लॅबोरेटरी उभारली आहे. खासदार लंके यांच्या कार्यकर्त्यांनी रस्त्याचे प्रत्यक्ष काम सुरू झाले किंवा नाही, याची सहकाऱ्यांनी पडताळणी केली. त्यानंतर लंके यांनी आंदोलन मागे घेतले. ठेकेदाराने काम वेळेत पूर्ण न केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल. वेळेत काम पूर्ण न झाल्यास ठेकेदारास मुदतवाढ देण्यात येणार नाही, असे लेखी आश्वासनात नमूद करण्यात आले आहे.

## हिवरेबाजार शाश्वत ग्रामीण विकासाचे मॉडेल : ना.प्रा.राम शिंदे



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** आदर्शगाव हिवरेबाजार ग्रामस्थांनी श्रमदान व एकजुटीतून राबविलेले विकासात्मक प्रयोग देशासाठी प्रेरणादायी असल्याचे गौरवोद्गार ना. राम शिंदे यांनी व्यक्त केले. पर्यावरण संवर्धनासाठी 'एक वृक्ष आईसाठी, एक वृक्ष देशासाठी' या संकल्पनेतून हिवरेबाजार येथील मातृस्मृती वनमंदिर परिसरात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंती, छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५० वा शिवराज्याभिषेक सोहळा, संत ज्ञानेश्वर माऊलींच्या ७२५ वा संजीवन समाधी सोहळा, संत तुकाराम महाराज यांच्या ३७५ वा वैकुंठगमन दिन आणि प्रजासत्ताक दिनाच्या अमृतमहोत्सवाचा समावेश या निमित्ताने एकूण १८७६ देशी वृक्षांची लागवड करण्याचा स्तुत्य उपक्रम हिवरे बाजार ग्रामस्थांनी हाती घेतला आहे. याच पार्श्वभूमीवर 'शालेय रानमेवा अभियान' ही संकल्पना देखील राबवण्यात आली. यावेळी कार्यक्रमात बोलताना राम शिंदे म्हणाले, या ऐतिहासिक वृक्षारोपण सोहळ्यात सहभागी होण्याचा सन्मान मला लाभला. तसेच, विधानपरिषद सभापतीपदी निवड झाल्याबद्दल हिवरेबाजार ग्रामस्थांच्या वतीने माझा आदरपूर्वक सन्मान व सत्कार केला. पदमश्री डॉ.पोपटराव पवार यांच्या संकल्पनेतून, गेल्या २६ वर्षांमध्ये हिवरेबाजार गावच्या विकासात सहकार्य करणाऱ्या विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या हस्ते दुर्मिळ १८७६ देशी वृक्षांची लागवड करण्याचा स्तुत्य उपक्रम सध्या हिवरेबाजार ग्रामस्थांनी हाती घेतलेला आहे.

हिवरेबाजार हे आदर्शगाव संपूर्ण देशभर एक उदाहरण ठरले आहे. जलसंधारण, सामाजिक समता आणि ग्रामविकासाच्या कार्यांमध्ये या गावाने दिलेला आदर्श आज अनेकांना प्रेरणा देतो. या गावाचा कायापालट झाला तो पद्मश्री डॉ. पोपटराव पवार यांच्या दूरदृष्टीने आणि निस्वार्थ नेतृत्वामुळे. त्यांनी केवळ पाणलोट विकास नव्हे तर शाश्वत ग्रामीण विकासाचे एक मॉडेल उभे केले आहे. याप्रसंगी, पदमश्री डॉ.पोपटराव पवार, आमदार काशिनाथ दाते,भाजपचे वसंतराव चेडे, हिवरेबाजार गावच्या सरपंच विमलताई ठाणगे यासह हिवरेबाजार ग्रामस्थ, एन.सी.सी छात्र, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

## विद्यार्थ्यांनी शालेय शिक्षणाबरोबर संगणकीय ज्ञान घ्यावे - सापोनि मनोज पवार



**अक्षराज : शिवराज मुगळे**

**दि.१२, सोलापूर :** सध्या एआयची क्रेझ वाढत आहे. या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन देण्याचे धोरण सरकारने स्वीकारले आहे. ही बाब चांगली असली तरी प्रत्यक्षात माणसाला खरे ज्ञान मानवी मेंदूच देऊ शकतो. तेव्हा विद्यार्थी आणि युवकांनी वाचन, चिंतन व मनन करून आपल्या ज्ञानात भर घालावे, असे आवाहन माजी प्राचार्य व ज्येष्ठ विचारवंत नरेश बदनोरे यांनी केले.

मंद्रूप येथील डी.एस.कमळे गुरुजी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट व निंबर्गी येथील तपस्वी कॉम्प्युटर इन्स्टिट्यूट यांच्या संयुक्त विद्यमाने एमएससीआयटी प्रशिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभात झाला. यावेळी केंद्रीय गृहमंत्रालयाचा 'उत्कृष्ट गुन्हे अन्वेषण पदक' मिळालेले मंद्रुपचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांचा सन्मान करण्यात आला. त्यावेळी बदनोरे बोलत होते. अध्यक्षस्थानी डॉ.चनगोंडा हविनाळे होते. यावेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे सचिव महादेव कमळे, विश्वस्त नागेश बिराजदार, सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार, भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष मळसिध्द मुगळे, राजू बिराजदार, सोमशंकर जवळकोटे, अभिजित जवळकोटे, अविनाश जवळकोटे, आदित्य जवळकोटे, पी.व्ही.कुलकर्णी, प्रा.डी.बी.कोळी, प्रा.जे.के.रोमन उपस्थित होते. डॉ.हविनाळे यांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी उच्च शिक्षणाला घेऊन जीवनात यशस्वी व्हावे. असे सांगताना मोबाइलच्या अतिवापरामुळे मनावर होणाऱ्या परिणामांची माहिती दिली. एम.डी. कमळे म्हणाले, जवळकोटे परिवाराचे ग्रामीण भागातील संगणक साक्षरतेसाठी योगदान उल्लेखनीय आहे. त्यांनी उभारलेल्या संस्थेला १५ वर्षांत ४२ हून अधिक पुरस्कार मिळाले आहेत. अनेक विद्यार्थी चांगल्या पदांवर गेले आहेत. सूत्रसंचालन सदाशिव व्हनमाने यांनी केले. आभार सोमशंकर जवळकोटे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अभिजित जवळकोटे, वंदना जवळकोटे, रेश्मा जवळकोटे आदींनी परिश्रम घेतले.

## आगामी चंद्रपूर मनपा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर भाजपच्या माजी नगरसेवकांची बैठक



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१३, चंद्रपूर :** आगामी चंद्रपूर महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर माजी नगरसेवकांची महत्वाची बैठक पार पडली. राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर आणि आमदार किशोर जोरगेवार यांनी माजी नगरसेवकांना मार्गदर्शन करतांना जनसंपर्क वाढविण्याच्या तसेच नागरिकांच्या समस्या प्राधान्याने सोडविण्याच्या सूचना केल्या. या बैठकीला महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, उपमहापौर अनिल फुलझेले, भाजप नेते अशोक जीवतोडे, युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष रघुवीर अहिर, प्रकाश देवतळे, अजय जयस्वाल, दशरथसिंह ठाकूर, मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, रवी जोगी, ॲड.सारिका संदूरकर, स्वप्नील डुकरे, भारतीय जनता पार्टीचे राज्य परिषद सदस्य तुषार सोम, वनिता कानडे यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे सर्व माजी नगरसेवक उपस्थित होते.

या बैठकीत पक्षसंघटना अधिक बळकट करण्यावर विशेष भर देण्यात आला. प्रभागातील स्थानिक समस्या, कार्यकर्त्यांच्या अडचणी आणि नागरिकांच्या अपेक्षा यावर सविस्तर चर्चा झाली. पक्ष कार्यकर्त्यांशी थेट संवाद साधत समस्या समजून घेण्याचा आणि आणि त्यावर ठोस उपाययोजना करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

यावेळी बोलताना राष्ट्रीय मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहिर म्हणाले कि, आपण केलेले काम आता प्रभावीपणे प्रभागातील नागरिकांपर्यंत पोहोचवा. पक्ष, जनसंपर्क आणि परिश्रम हा निवडणूक जिंकण्याचा मंत्र आहे, असे आवाहन त्यांनी सर्व माजी नगरसेवकांना केले. यावेळी बोलताना आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले की, आजची ही बैठक केवळ निवडणूक तयारीची नाही, तर आपल्या एकत्रित ताकदीचा आणि पक्ष संघटनेच्या दृढतेचा संकल्प करण्यासाठी आहे. लोकांशी थेट संपर्क ठेवून त्यांच्या अडचणी सोडविणे हीच आपल्या कामाची खरी ओळख आहे. आपण एकसंघ राहून काम केले पाहिजे असे ते म्हणाले. या कार्यक्रमात भाजपचे राज्य परिषद सदस्य म्हणून निवड झाल्याबद्दल तुषार सोम यांचा सत्कार करण्यात आला.

## मुंबईत स्वतःच्या हक्काचं घर घेणाऱ्यांच स्वप्न होणार साकार...

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** मुंबईत स्वतःच्या हक्काचं घर असावं असं इथे राहणाऱ्या प्रत्येकाला वाटत असतं. पण कोट्यवधी रुपये खर्चून सर्वसामान्यांना घर घेणं परवडत नाही. मात्र म्हाडा सर्वसामान्यांचं हे स्वप्न पूर्ण करत आहे. दरम्यान मुंबईतील म्हाडाच्या विविध वसाहतींच्या पुनर्विकासातून १२,००० पेक्षा अधिक नव्या घरांची निर्मिती होणार असून या घरांची लॉटरी लवकरच काढली जाणार आहे.




### लवकरच म्हाडाची १२ हजार घरांची बंपर लॉटरी

वांद्रे रेक्लेमेशन, आदर्शनगर (वरळी), अभ्युदयनगर, कामाठीपुरा, जीटीबी नगर आणि मोतीलालनगर या ठिकाणच्या म्हाडा वसाहतींचा पुनर्विकास करण्यासाठी बांधकाम आणि विकास संस्थेची नियुक्त करण्यात आली आहे. या उपक्रमांतर्गत येत्या ४ - ५ वर्षांत नागरिकांना अधिक प्रशस्त, आधुनिक आणि सुविधायुक्त घरे मिळणार आहेत. या पुनर्विकासामुळे म्हाडाच्या ताब्यात सुमारे १० हजार ते १२ हजार नवीन घरे येतील, जे लॉटरी द्वारे विक्रीसाठी उपलब्ध होतील. राज्य सरकारने म्हाडाच्या वसाहती आणि काही उपकरप्राप्त इमारतींच्या संयुक्त पुनर्विकासाला मंजुरी दिली आहे. विशेषतः कामाठीपुरा व जीटीबीनगरमधील सिंधी निर्वासित वसाहतींचा समावेश यामध्ये आहे.

यासाठी विशिष्ट बांधकाम संस्था नेमण्यात आली आहे. अभ्युदयनगर आणि कामाठीपुरा या भागांसाठी नव्या संस्थांची निवड करण्यासाठी निविदा प्रक्रिया सुरू आहे.

वांद्रे रिक्लेमेशन व आदर्शनगर (वरळी): या दोन ठिकाणच्या म्हाडा वसाहतींच्या पुनर्विकासामुळे सुमारे १ हजार ते १ हजार ५०० नव्या घरं उपलब्ध होणार आहेत.

अभ्युदयनगर (काळाचौकी) :- म्हाडाच्या विकास संस्थेद्वारे येथे सुमारे ५०० ते ६०० नवीन सदनिका बांधल्या जातील.

कामाठीपुरा :- सुमारे ८,००० भाडेकरूंना प्रत्येकी ५०० चौरस फुटांची घरे आणि ८०० मालकांना प्रत्येकी ५० चौरस मीटरची सदनिका मिळेल.

या प्रकल्पातून म्हाडाला ४४ हजार चौरस मीटर क्षेत्र मिळून १,००० - १,२०० घरे मिळण्याची शक्यता आहे.

मोतीलालनगर (गोरेगाव पश्चिम) :- अदाणी समूहाकडून पुनर्विकास होत असून, ३,७०० रहिवाशांना १,६०० चौरस फुटांची घरे दिली जातील. यामध्ये म्हाडाला सुमारे ७ हजार - ८ हजार घरे उपलब्ध होणार आहेत.

जीटीबीनगर :- ११.२० एकर क्षेत्रफळावर आधारित प्रकल्पात १,२०० रहिवाशांना ६३५ चौरस फुटांची घरे देण्यात येणार असून, म्हाडाच्या ताफ्यात ७०० - ८०० नवीन घरे जमा होतील.दरम्यान या सर्व प्रकल्पांमुळे मुंबईतील सामान्य नागरिकांसाठी घर घेणे अधिक सुलभ होणार असून ते परवडणाऱ्या दरात घरांचं स्वप्न पूर्ण होणार आहे.

## रंगुनी रंगात गझलांचे सूर; उसगावात मराठी गझल मुशायऱ्याची रंगतदार मेजवानी




**अक्षराज : विनायक भोईर**

**दि.१३, उसगाव (पालघर) :** श्रमजीवी संघटना आणि विधायक संसद यांच्या संयुक्त विद्यमाने उसगावच्या संविधान सभागृहात भरविण्यात आलेला रंगुनी रंगात साजरा हा मराठी गझल मुशायरा रसिकांच्या टाळ्यांच्या कडकडाटात आणि रंगतदार वातावरणात थाटात पार पडला.

मराठी गझलविश्वातील दिग्गज कवी आणि नव्या दमाच्या गझलकारांनी सामाजिक, भावनिक आणि समकालीन विषयांवर गझलांची बहारदार फुले उधळत रसिकांना मंत्रमुग्ध केले. यावेळी काही गझलांनी श्रमजीवी संघटनेच्या संघर्षाची चुणूक दाखवत, कष्टकऱ्यांच्या व्यथा, त्यांच्या स्वप्नांची झुंज, अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची प्रेरणा देणारे शब्द उलगडले.

विशेषतः कार्यक्रमात श्रमजीवी संघटनेचे संस्थापक विवेक पंडित यांनी स्वतः सुरेश भट यांच्या 'आता जगायचे असे माझे किती क्षण राहिले' आणि 'नाही म्हणायाला आता असे करूया' या गझला आपल्या खास आविष्कारात सादर करताना, त्यातील अर्थ श्रमजीवींच्या संघर्षाशी जोडून रसिकांच्या काळजाला भिडवला. त्यांच्या या सादरीकरणाला टाळ्यांचा प्रचंड गजर मिळाला.

याशिवाय आनंद पेंढारकर, सुप्रिया पुरोहित-हळबे, जयंत कुळकर्णी, कॅप्टन वैभव दळवी, महेश केळूसकर, डॉ. प्रमोद बेजकर, गोविंद नाईक आणि अशोक मुळे यांच्या सादरीकरणांनीही रसिकांच्या मनात दीर्घकाळ घुमणारे सूर निर्माण केले. सायंकाळी ४:३० वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुबक, शिस्तबद्ध आणि रसिकांच्या सोयीचा विचार करून करण्यात आले होते. मराठी साहित्यावर प्रेम करणाऱ्या श्रोत्यांनीही मोठ्या उत्साहाने आणि शांततेत गझलांचा आस्वाद घेतला. कार्यक्रमाला अध्यक्ष रामभाऊ वारणा, जनरल सेक्रेटरी विजय जाधव यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून कवी व रसिक यांना प्रेरणा दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पालघर जिल्हाध्यक्ष सुरेश रेंजड यांनी आत्मियतेने केले. मराठी गझलप्रेमींसाठी ही केवळ एक काव्यसंध्याच नव्हती, तर श्रमजीवींच्या संघर्षाला आणि भावनांना कवितेतून उजाळा देणारा, मनात दीर्घकाळ रेंगाळणारा एक प्रेरणादायी सांस्कृतिक सोहळा ठरला.

## कै. स्वप्निल टापसे यांचा भिषण अपघातात दुर्दैवी मृत्यू

### 'भैय्या' ची ती रात्र ठरली वैऱ्याची !



**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.१३, विंचूर (नाशिक) :** ती सायंकाळ म्हणजे दि.०९ जुलै २०२५ ची सायंकाळचे ६:३० वाजेची वेळ कै. स्वप्निल टापसे यांना ठरली अखेरची.. असा अंगाचा भयावह थरकाप करणारी ही घटना. नाशिक येथील वाडीवऱ्हे येथील व्हीटीसी चौफुली जवळ घडली.

स्वप्निल हा जॉब करत असताना इगतपुरी वरून घरी परतत असतांना वाडीवऱ्हे येथील पेट्रोल पंपावर मोटर सायकल ला पेट्रोल भरले आणि आत्ताच दीड महिन्यापूर्वी त्याचे लग्न झाले होते,आणि पत्नीला त्याने ६:०० वाजता फोन करून सांगितले मी अर्ध्या तासात घरी येतो, आणि त्याचा तो फोन अखेरचाच ठरला.आणि पुढे जात असताना व्हीटीसी जवळ स्पीड ब्रेकर जवळ त्याला अज्ञात वाहनाने पाठीमागुन मागून इतकी जबर धडक दिली. आणि अशा परिस्थितीत तो रस्त्यावर दोन ते अडीच तास पडलेला होता. त्याला कोणीही मदतीला धावून आले नव्हते. आणि रात्री ८ वाजता त्याला रुग्णवाहिका घ्यायला आली पण त्यावेळेस स्वप्नील या जगाला सोडून गेला होता. नंतर शासकीय रुग्णालयात त्याला दाखल करण्यात आलं. हा अपघातच इतका भीषण होता अंगाचा थरकाप करणार होता आणि डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. स्वप्निल चे वय ३४ वर्ष त्याचे बालपण विंचूर येथे सुनील क्षिरसागर या मामाच्या गावी गेले. कारण स्वप्नील ची आई सुद्धा (कै.निता टापसे) ह्या तो तीसरीत असतानाच त्याला सोडून गेल्या होत्या. आणि त्याचे सर्व शिक्षण संगोपन मामाकडे झाले. उर्वरित शिक्षण नाशिक येथे मावश्या कडे स्वाती वटारे व ज्योती वारे यांच्याकडे राहुन, ब्रह्मा व्हॅली त्रंबकेश्वर येथे एम बी ए पूर्ण केले होते.

या घटनेमुळे वारे, वटारे, क्षीरसागर व टापसे कुटुंबीयावर खूप मोठा दुःखाचा डोंगर कोसळला आहे. स्वप्निल च्या पश्चात पत्नी, मोठा भाऊ, मामा, मामी, मावश्या, काका, मामे भाऊ , मावस भाऊ, भावजाई, पुतणी असा परिवार आहे. तसेच या परीवारा कडून अशी मागणी होत आहे कि, सदर हा अपघात झाला ते वाहन कुणी बघीतले असेल तर या मोबा. ९८२२५८५३०५ नंबर वर संपर्क करावा अशी दुःखद अंतः करणाने मागणी केली आहे.

# यंदाच्या वारीत पांडुरंग लालपरीला पावला; एसटी महामंडळ झाले मालामाल

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१३, मुंबई :** यंदा आषाढी एकादशीनिमित्त एसटी महामंडळाने विठ्ठल भक्तांच्या सोयीसाठी शेकडो बसेस उपलब्ध करून दिल्या होत्या. या विठ्ठल भक्तांसाठी पंढरपूर येथील विठुरायाचे दर्शन घडवण्यासाठी ५ हजार २०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या. त्याचा फायदा तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भक्तांनी घेतला. त्यातून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजारांचे उत्पन्न मिळाले असल्याची माहिती परिवहनमंत्री तथा महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली.

राज्याचे परिवहनमंत्री सरनाईक यांनी वारी कालावधीत मिळालेल्या एसटी महामंडळाच्या उत्पनाची माहिती दिली. विठुरायाचे दर्शन घडवण्यासाठी ५ हजार २०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या. त्याचा फायदा तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भक्तांनी घेतला. त्यातून एसटीला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजारांचे उत्पन्न मिळाले आहे. हे उत्पन्न गेल्या वर्षीपेक्षा अधिक असल्याची माहिती दिली. या सर्व प्रवाशांची एसटीच्या चालक, वाहकांनी सुरक्षितपणे ने-आण करून त्यांना विठ्ठल दर्शन घडविल्याचे त्यांनी सांगितले.

दरवर्षी आषाढी एकादशी निमित्त राज्यातून श्रीक्षेत्र पंढरपूर येथे भाविक वारीसाठी येत असतात. या भाविकांना त्यांच्या गावापासून पंढरपूरपर्यंत ने-आण करण्यासाठी यंदा एसटीने ३ ते १० जुलै दरम्यान, तब्बल ५ हजार २०० ज्यादा बसेस सोडल्या होत्या. या बसेसनी २१ हजार ४९९ फेऱ्या करून तब्बल ९ लाख ७१ हजार ६८३ भाविकांची सुरक्षित ने-आण केली. त्यातून एसटी महामंडळाला ३५ कोटी ८७ लाख ६१ हजार रुपये इतके उत्पन्न मिळाले, जे मागील वर्षी मिळालेल्या उत्पन्नापेक्षा ६ कोटी ९६ लाख ३ हजार रुपयांनी जास्त असल्याचे सरनाईक यांनी सांगितले.




आषाढी एकादशीनिमित्त श्रीक्षेत्र पंढरपूर येथे मोठी यात्रा भरते. त्यासाठी मराठवाड्यातूनही मोठ्या प्रमाणात भाविक रवाना होतात. राज्य परिवहन महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाने यासाठी नियोजन केले होते. त्यासाठी तब्बल १० दिवस दररोज १३५ बसेस संभाजीनगरमधून धावल्या. त्यानंतर आता या बसेसच्या माध्यमातून मिळालेल्या उत्पन्नाची माहिती दिली जात आहे. दरम्यान ऐनवेळी जास्त गर्दीमुळे मागणी वाढली तर तात्काळ वाढीव बस सोडल्या जाणार असल्याची माहिती एसटीने दिली होती. त्यानुसार, काही ठिकाणी या ज्यादा बसेस सोडण्यात आल्या. छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानक आगारातून पंढरपूरला रवाना होणाऱ्या प्रवाशांसाठी २५. सिडको बसस्थानक येथून ३०, पैठणहून २०, सिल्लोड येथून २०, वैजापूरहून १०, कन्नडहून १०, गंगापूर येथून १० तर सोयगाव बस्टेंडवरून १० अशा १३५ बस रवाना झाल्या होत्या.

# ओबीसीमधील मराठा आरक्षणाला विरोधच माजी खा.समीर भुजबळ

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, अहिल्यानगर :** ओबीसी समाजाचे आरक्षण टिकवण्यासाठी समता परिषद ही सातत्याने या विषयावर काम करणार असून मराठा समाजाला स्वतंत्र आरक्षण दिले आहे. ईडब्ल्यूएसच्या सवलतीचा त्यांना १० टक्क्यांमधील साडेआठ टक्के लाभ मिळत आहे, आता ओबीसींच्या आरक्षणामध्ये त्यांच्या आरक्षणाचा विषय होऊ नये व ओबीसींवर गदा आणू नये, असे स्पष्ट करत ओबीसीमधील मराठा आरक्षणाला समता परिषदेचे कार्याध्यक्ष सदस्य माजी खासदार समीर भुजबळ यांनी विरोध दर्शवला आहे.

नगरमध्ये दिनांक १२ जुलै २०२५ रोजी समता परिषदेच्या पदाधिकारी निवडीनंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी भुजबळ म्हणाले की, जातीनिहाय जनगणना झाली पाहिजे, अशी भूमिका समता परिषदेने गेल्या ३० वर्षांपूर्वी मांडली होती. ज्येष्ठ नेते छगन



भुजबळ यांनी वेळोवेळी या संदर्भामध्ये आवाज सुद्धा उठवलेला होता. त्या वेळच्या सरकारांनी त्याबाबतचा निर्णय घेतला नाही, म्हणून हा विषय प्रलंबित होता. आता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातीनिहाय जनगणना करण्याचा निर्णय घेतला आहे, तो योग्य आहे असे ते म्हणाले. मराठा समाजाला आरक्षण मिळावे, यासाठी मेळावे आंदोलने मोर्चे होत आहे. पण दुसरीकडे ओबीसींच्या जागेवर सर्व काही निर्णय घेणे योग्य नाही. ओबीसींच्या न्याय हक्कासाठी आम्ही काम करतो. उद्या मोर्चा निघतील सरकारच्या माध्यमातून ते हाताळले जातील. पण सर्व ओबीसी जातीच्या लोकांना एकत्र आणले पाहिजे अशी आमची प्रमुख भूमिका आहे. त्यासाठी ओबीसी चळवळ काम करत असल्याचे ते म्हणाले. ओबीसी समाजाच्या आरक्षणामध्ये त्यांना टाकणे योग्य नाही. मराठा समाजाला वेगळे आरक्षण मिळाले, पाहिजे अशी आमची भूमिका असल्याचे भुजबळ यांनी स्पष्ट केले.

सर्व ओबीसी संघटनांना एकत्र करणे अतिशय अवघड आहे. पण आम्ही ते सर्व प्रयत्न करत आहोत. अनेक घटकांना आरक्षणाविषयी माहिती नसते, त्यामुळे त्यांना जागृत करण्याचे काम आम्ही करत असल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

## मराठा समाजाला वेगळे आरक्षण मिळावे

**पिढ्यानपिढ्या चा जातीवाद संपला पाहिजे**

पिढ्यानपिढ्या सुरू असलेल्या जातीवाद संपला पाहिजे, असं म्हणत असतानाच कोणीतरी डोकं वरती काढतो व पुन्हा हा मुद्दा उपस्थित करत आहे, म्हणून पुन्हा आरक्षणाचा विषय सुरू होतो. जातीनिहाय जनगणना ही झाली पाहिजे. कारण या अगोदर एसी व एसटीची जनगणना होत होती. त्यावेळेला निधी आयोगामार्फत निधी दिला जातो. त्यामध्ये सर्व ओबीसींना निधी मिळत नाही, ही वस्तुस्थिती आहे. ओबीसीचे आरक्षण रहाणे हे महत्त्वाचे आहे व त्यासाठी आम्ही आता संघटनेच्या माध्यमातून सर्वांना एकत्र करण्याचं ठरवलेलं आहे.

# कासारे गावच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील - सुजित झावरे पाटील



## कासारे येथे विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१३, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील कासारे गावाच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेले जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष सुजित झावरे पाटील यांच्या माध्यमातून मंजूर झालेल्या विविध विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन समारंभ कासारे येथे मोठ्या उत्साहात पार पडले. याप्रसंगी बोलताना सुजित झावरे पाटील म्हणाले, कासारे गावच्या विकासासाठी कटिबद्ध असून गावाच्या विकासासाठी निधी कमी पडू दिला जाणार नसल्याची ग्वाही दिली. भविष्य ही बिरोबा देवस्थान व परिसराच्या विकासासाठी आवश्यक त्या सर्व योजना राबविल्या जातील. यामुळे कासारे गावाचा धार्मिक, सामाजिक आणि भौगोलिक विकास नव्या उंचीवर नेणारा ठरेल, असा विश्वास ग्रामस्थांनी व्यक्त केला. यावेळी अरुणराव ठाणगे, अमोल साळवे, दिलीप पाटोळे, बाळासाहेब झावरे, सरपंच शिवाजी निमसे, उपसरपंच शैला घनवट, चेअरमन विश्वनाथ दातीर, धनंजय निमसे, महेंद्र रोकडे, बाबाजी दातीर, शंकरराव घनवट यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बिरोबा देवस्थान व परिसरातील विकासकामांचे लोकार्पण
श्री.बिरोबा देवस्थान भक्तनिवास लोकार्पण
श्री.बिरोबा देवस्थान संरक्षण भिंत लोकार्पण
निवडुंगेवाडी ते कासारे डोंगर घाट रस्ता सुशोभीकरण लोकार्पण
बिरोबा देवस्थान कार्यालय लोकार्पण
कासारे ते पिंपळगाव रोठा घाट रस्ता सुशोभीकरणाचे भूमिपूजन
या लोकार्पण समारंभासाठी श्री. मुक्ताई देवी, श्री.यमाई देवी व श्री.महादेव मंदिर येथील कलशारोहण सोहळा ही पार पडला.

# रांधेच्या श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरु पौर्णिमेला भाविकांचा महापूर

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील प्रति अक्कलकोट म्हणून प्रसिद्ध असलेल्या रांधे च्या माळवाडी येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात गुरु पौर्णिमेला अभूतपूर्व असा भाविकांच्या भक्तीचा महापूर आला होता. अहिल्यानगर व पुणे जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते .

गुरु पौर्णिमेच्या दिवशी पहाटे श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मुर्तीला अभिषेक करण्यात आला. दिवसभर विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या वेळी दिवसभर श्री स्वामी भक्तांनी दर्शनासाठी मोठ्या हजेरी लावत मनोभावे दर्शन घेतले, तर रात्री ७ वाजता प्रसिद्ध किर्तनकार हभप



अशोक महाराज शिंदे यांच्या सुश्राव्य वाणीतून श्री स्वामी समर्थ महाराजांच्या जीवन कथेवर आधारित हरि किर्तन संपन्न झाले. तदनंतर मान्यवरांच्या शुभ हस्ते श्री स्वामी समर्थ महाराजांची महाआरती मोठ्या भक्ती भावाने संपन्न झाली. भाविक भक्तांना पेढे, लाडू, खडी साखर, केळी, फळ असा प्रसाद देण्यात आला. प्रति अक्कलकोट असलेल्या रांधे च्या माळवाडी येथील या मंदिरात दिवसेंदिवस भाविकांची गर्दी वाढत आहे.

यावेळी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या दर्शनासाठी अक्षरशः भाविक भक्तांनी सुग्रास महाप्रसाद घेण्यासाठी मोठ्या गर्दीत पण रांगेतून मोठ्या भक्ती भावाने लाभ घेतला. तद्नंतर रांधे येथील माळवाडी हा ग्रामीण भाग असून ही दुचाकी, चार चाकी, बस व इतर अनेक वाहनांची मोठ्या संख्येने वर्दळ झाली होती. सर्व बाजूच्या मार्गावर प्रचंड गर्दी झाली होती.

या भव्य सोहळ्याचे देखणे व निटनिटके नियोजन श्री स्वामी समर्थ देवस्थान ट्रस्टचे संस्थापक अनिलराव आवारी व अध्यक्ष सुभाषराव भोसले यांच्या नेतृत्त्वाखाली पदाधिकारी व ग्रामस्थांनी केल्याने हा सोहळा नयनरम्य वातावरणात पार पडला.

# थोडक्यात

## अभिनव विद्या मंदिर बोरीवली (पूर्व) मुंबई येथे वृक्षारोपण सोहळा संपन्न



**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** महाराष्ट्र राज्य शिक्षक सेनेच्या वतीने पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धव साहेब ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना अध्यक्ष, आमदार ज.मो.अभ्यंकर यांच्या संकल्पनेतून प्रेरणा मास २७ जून ते २८ जुलै वृक्ष लागवड व संगोपन या उपक्रमाअंतर्गत दिनांक १२ जुलै २०२५ रोजी अभिनव विद्या मंदिर, बोरीवली (पूर्व), मुंबई येथे महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना अध्यक्ष, आमदार ज.मो.अभ्यंकर यांचे शाळेच्या विद्यार्थ्यांनी लेझीम ढोल पथकाने स्वागत केले. पारंपारिक सांस्कृतिक पद्धतीने विद्यार्थ्यांनी साहेबांचे औक्षण केले. सन्माननीय आमदार अध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक सेना श्री.अभ्यंकर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. सदर शाळेच्या मुख्याध्यापिका प्राची वालकर, सचिव अमीन ठाकूर तसेच सर्व शिक्षक वर्ग आणि विद्यार्थी वर्ग यांच्या हस्ते ही वृक्षारोपण करण्यात आले. सन्मा. श्रीअभ्यंकर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना वृक्ष संवर्धनाची जबाबदारी घेण्याचे आवाहन केले. रामचंद्र गावडे, तेजस्वी निवाते आणि मंदाकिनी आवटे यांच्या नियोजनाने कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

## प्रा.निसार शेख यांना डॉक्टरेट



**अक्षराज : रोहन रंधवे**

**दि.१३, श्रीगोंदा (अहिल्यानगर) :** काष्टी येथील परिक्रमा फॅकल्टी ऑफ मॅनेजमेंट कॉलेजचे प्रा.निसार शेख यांना डॉक्टर ए.पी. जे अब्दुल कलाम विद्यापीठ मध्य रोल ऑफ इन्फॉर्मेशन अँड टेक्नॉलॉजी अँड आयटी एन्याब्लड सर्विसेस इन डेव्हलपमेंट ऑफ अग्रिकल्चर विथ रेफरन्स टू अहमदनगर डिस्ट्रिक्ट या विषयात डॉक्टरेट ही पदवी मिळाली. यशाबद्दल संस्थेचे संस्थापक महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री बबनरावजी पाचपुते, परिक्रमा शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा डॉ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी अ‍ॅड.प्रतापसिंह बबनरावजी पाचपुते, अतिरिक्त कार्यकारी अधिकारी व मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा.अनिल पुंड, अकॅडमी डायरेक्टर इंद्रायणी पाचपुते, अकॅडमी डे.डायरेक्टर प्रा. डॉ.संजीव कदम पाटील, प्र.प्राचार्य मोहन धगाटे, प्राचार्य डॉ.सुनील निर्मळ, प्रा.डॉ.सुदर्शन गिरमकर, प्राचार्य डॉ.रमेश शिंदे, प्राचार्य डॉ.पांडुरंग इथापे, प्राचार्य.डॉ.प्रशांत सूर्यवंशी यांनी अभिनंदन केले.


## पारनेर, वडनेर, गटेवाडी, जातेगाव, नारायणगव्हाण, शिरूर ही बस सुरू करा



**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१३, सुपा (अहिल्यानगर) :** सध्या नगर पुणे महामार्गावर अपघाताचे प्रमाण वाढत आहे ग टेवाडी जातेगाव घाणेगाव नारायणगहाण येथील नागरिकांना शिरूर व पारनेर ला जाण्यासाठी तसेच वयोवृद्ध नागरीक शाळेतील मुले यांना जाण्यासाठी नगर पुणे महामार्गावर जावा लागते नागरीकांची गैरसोय थांबावी म्हणुन ही बस पुन्हा नव्याने चालू करा. पारनेर वडनेर-गटेवाडी घाणेगाव जातेगाव नारायणगव्हाण शिरूर ही बस गेली २५ ते वर्षापासन सुरु होती केलेली बस सुरू करा. पारनेर गटेवाडी जातेगाव नारायणगव्हाण शिरूर अशी १० वर्षापुर्वी पासून अनेक वर्षे सुरू होती. त्यामुळे वडनेर, घाणेगाव, गटेवाडी, जातेगाव, नारायणगव्हाण, वाडेगव्हाण, यादववाडी, मावळेवाडी इ. गावातील हायस्कूल व महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सदर बस फार सोईस्कर होती. सदर बस कोणतेही संयुक्तीक कारण नसताना बंद केलेली आहेतरी सदर बस सेवा त्वरीत सुरू करावी ही विनंती. असे निवेदन पारनेर आगार व्यवस्थापक यांना दिले आहे. या निवेदनावर सुरेश बबन बोन्हुडे माजी सरपंच नारायणगव्हाण तथाउपाध्यक्ष, श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, जातेगाव, जयसिंग बबन धोत्रे, माजी सरपंच वाडेगव्हाण विशवस्त, श्री भैरवनाथ देवस्थान ट्रस्ट, जातेगावचे सरपंच विठ्ठल पोटघन, विशाल हरिभाऊ फटांगडे यांची निवेदन वर सह्या आहेत.

## उदगीर तालुका शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा गुडसूर ग्रामपंचायतकडून जाहीर सत्कार



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि.१३, उदगीर (लातुर) :** अध्यक्ष विठ्ठलराव मरलापल्ले तर सचिव सर्जेराव भांगे, चेअरमन नंदकिशोर काळे, उपाध्यक्ष भरत निलेवाड, संचालक मारोती लांडगे, अरूण बिरादार, जनार्दन जाधव, मार्गदर्शक तथा माजी संचालक बालाजी धमनसूरे, विरभद्र देशमुख, हेमलता बिरादार, माधव देमगुंडे, सरपंच उत्तम सूर्यवंशी व उपसरपंच बालाजी देमगुंडे पत्रकार नागेश नवाडे, जयराम देमगुंडे, माधव टेपाले गोविंद शृंगारे, अशोक मुस्कावाड शैलेश देमगुंडे, यांनी सत्कार केला. या प्रसंगी प्रास्ताविक उपसरपंच बालाजी देमगुंडे यांनी केले. तर सचिव सर्जेराव भांगे बालाजी धमनसूरे सर यांनी पतसंस्थेच्या कार्याची माहिती दिली. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रकाश कुलकर्णी, कपील गुणाले, संदिप गुणाले, लक्ष्मण सूर्यवंशी, चमन सय्यद व इतर ग्रामस्थांनी सहकार्य केले.